लोकमत

# जिल्हा प्रशासनाकडून पुन्हा ताबा मिळाल्यानंतरच वसतिगृह प्रवेश

## ऑनलाईन शिक्षणाची तयारी



विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष जूनमध्ये सुरु झाले आहे. अद्याप पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली नाही. द्वितीय, तृतीय वर्षात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे वर्ग लवकर भरतील असे चित्र नाही. त्यावर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून रसायनशास्त्र, पर्यावरणशास्त्र, आदी विविध विभागांतील प्राध्यापकांनी ऑनलाईन शिक्षण देण्याची तयारी सुरु केली आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील चार वसतिगृहे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आहेत. या प्रशासनाकडून संबंधित वसतिगृहे पुन्हा विद्यापीठाच्या ताब्यात मिळाल्यानंतरच त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. त्याबाबतची प्रतीक्षा विद्यापीठाला लागली आहे.

सध्या गेल्या सव्वातीन महिन्यांपासून विद्यापीठातील एकूण अकराशे विद्यार्थ्यांची क्षमता असलेले तंत्रज्ञान अधिविभागातील एक वसतिगृह आणि मुलांचे वसतिगृह क्रमांक एक, दोन आणि तीन जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आहेत. त्या ठिकाणी संस्थात्मक अलगीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या विविध वसतिगृहांमध्ये राहणारे सुमारे तीन हजार विद्यार्थी हे मार्चच्या अखेरीस आपापल्या गावी गेले आहेत. त्यांचे साहित्य विद्यापीठाने वसतिगृहातील दोन ते तीन खोल्यांमध्ये ठेवले आहे.

जुलैमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार आणि त्यानंतर वर्ग भरणार असे गृहीत धरून विद्यापीठाने संबंधित वसतिगृहे पुन्हा ताब्यात मिळावीत यासाठी गेल्या महिन्याभरापूर्वी जिल्हा प्रशासनाशी पत्रव्यवहार केला. त्यासह वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना त्यांचे साहित्य परत देण्याचे नियोजन जाहीर केले. त्यानुसार जूनमध्ये ११० विद्यार्थ्यांनी साहित्यही नेले; पण जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने प्रशासनाने सध्या तरी वसतिगृहे ताब्यात देण्यास असहमती दर्शविली आहे. १४०० विद्यार्थिनी राहण्याची क्षमता असलेले मुलींचे वसतिगृहही ताब्यात घेण्याची चाचपणी प्रशासनाने केली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून पुन्हा ताबा मिळाल्यानंतरच विद्यार्थ्यांचा वसतिगृह प्रवेश होणार असल्याचे दिसत आहे. दरम्यान, याबाबत विद्यापीठाची पुढील कार्यवाही जाणून घेण्यासाठी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

पुढारी

# परीक्षा मंडळ संचालक पदासाठी सहा जण पात्र



## शिवाजी विद्यापीठातून...

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या रिक्त असणाऱ्या संचालक पदासाठी सहा जण पात्र ठरले आहेत तर दहा जण अपात्र ठरले आहेत.

एप्रिल २०१९ मध्येही प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मुलाखतीसाठी निवडलेल्या सहा जणांमध्ये यापूर्वी परीक्षा नियंत्रक म्हणून काम केलेले महेश काकडे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक अर्जुन घाटुळे, सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील सातारा येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातील सुहास पाटील, सायबरमधील माजी प्राध्यापक शिवाजी मुंडे, योगेश पाटील, सुजाता आडमुठे यांचा समावेश आहे. सध्या कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर मुलाखतीची तारीख जाहीर केली जाणार आहे.

# परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक पदासाठी ६ अर्ज वैध

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक पदरिक्त आहे. गेले वर्षभर ही प्रक्रिया ठप्प होती. आज पुन्हा प्रक्रिया सुरु झाली. आलेल्या १६ अर्जांपैकी ६ अर्ज पात्र ठरवण्यात आले. तर दहा अर्ज अपात्र ठरले. याची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक पदरिक्त आहे. एप्रिल २०१९ मध्ये याची निवड प्रक्रिया सुरु झाली होती मात्र वर्षभरापासून ही प्रक्रिया ठप्प होती. आता ही प्रक्रिया सुरु झाली आहे. या पदासाठी प्राप्त झालेल्या १६ अर्जांपैकी ६ अर्ज पात्र ठरविण्यात आले असून १० अर्ज अपात्र ठरविण्यात आले आहेत. मुलाखतीसाठी निवडलेल्या ६ जणांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परीक्षा संचालक महेश काकडे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक अर्जुन घाटुळे, सातारा येथील कर्मवीर पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील सुहास पाटील, सायबरचे माजी प्राध्यापक शिवाजी मुंडे, योगेश पाटील, सुजाता आडमुठे यांचा समावेश आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर मुलाखती घेतल्या जाणार आहेत.



लोकमत

सारांश

# विद्यापीठाच्या मुख्य इमारतीचे निर्जंतुकीकरण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील व्यवस्थापन परिषदेच्या हॉलसह विविध विभागांच्या कक्षांचे बुधवारी निर्जंतुकीकरण करण्यात आले. तीन दिवसांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या दौऱ्यांतर्गत सीमाभागातील महाविद्यालय आणि विद्यापीठाच्या विविध प्रश्नांबाबत बैठका घेण्यात आल्या. त्यावेळी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध संघटनांचे पदाधिकारी, सदस्यांनी मागण्यांची निवेदने देण्यासाठी या इमारतीमध्ये गर्दी केली होती. त्यावर दक्षता म्हणून या हॉलसह विविध कक्ष आणि कॉरिडॉरचे निर्जंतुकीकरण केले.